RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 120 | Dec. 2023 | Peer Refreed & Indexed Journal

# भारताच्या अंतर्गत सुरक्षेपुढील आव्हाने

**प्रा. डॉ. विठ्ठल सांडूर**

लोकप्रशासन विभागप्रमुख, महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा, जि.लातूर (महाराष्ट्र)

---

**प्रस्तावना (Introduction) :**

जागतिक आर्थिक महासत्ता बनू पहाणाऱ्या भारतास अंतर्गत आणि बाह्य सुरक्षेच्या कारणावरून कसरत करावी लागत आहे. बाह्य दृष्टीने पाकिस्तान, चीन, बांग्लादेश सतत भारतावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करत असतात. सध्या चीन कोणत्या ना कोणत्या तरी कारणाने भारताचे जागतिक राजकारणातील श्रेष्ठत्व कमी करण्याचा प्रयत्न करतो आहे. दुसरीकडे पाकिस्तान भारतविरोधी दूषीत प्रचार करतो तर बांग्लादेश आपल्या सीमेतून भारतात दहशतवादी व बांग्लादेशी नागरिक पाठवितो. एवढ्या मोठ्या प्रमाणात बाह्य अडचणी असतांनाही भारत अंतर्गत सुरक्षिततेबाबत निश्चिंत असू शकत नाही, कारण भारताला अंतर्गत सुरक्षिततेबाबतही अनेक आव्हान आहेत.

वर्तमान काळात उदारमतवादी लोकशाही देशामध्ये भारतात एक महान व मोठी लोकशाही नांदत आहे. अशा महान भारताच्या अंतर्गत सुरक्षा व्यवस्थेपुढे अनेक समस्या तोंड वासून उभ्या रहात आहेत. त्यात प्रामुख्याने सांप्रदायिकता (Communalism) खूप मोठे आव्हान आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर जेव्हा भारतामध्ये संविधानाद्वारे धर्मनिरपेक्ष, लोकशाही, प्रजासत्ताक राज्याची स्थापना केली गेली. गोखले इ. महान व्यक्तींनी ही अपेक्षा केली होती की, राजकारणाला धर्मापासून बाजूला ठेवल्याने हिंदू-मुस्लिम विरोध समाप्त होईल. मात्र ही अपेक्षा फोल ठरली. मागील 26 वर्षापासून रामजन्मभूमी विरूद्ध बाबरी मशीद विवादाने सांप्रदायिकतेला जो वाव मिळाला आहे. त्यामुळे भारतीय राजकारण सांप्रदायिक भावनेमध्ये बुडून गेले आहे.

संप्रदायवाद किंवा जमातवाद म्हणजे धर्म किंवा संप्रदायाच्या आधारावर एकमेकांमध्ये भेदभाव केला जाणे होय. डॉ.ई.स्मिथच्या मते, "सांप्रदायिकतेला कोणत्याही धार्मिक गटांचे स्वार्थ, विभाजनवादी प्रवृत्ती आणि आक्रोशपूर्ण दृष्टिकोनाशी संबंधीत मानले जाते. भारतामध्ये मुस्लिम लीग, मुस्लीम मजलिस, इस्लामिक सेवक संघ, मजलिसे मुशब्बरात, हिन्दू महासभा, अकाली दल, बजरंग दल, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, शिवसेना, मराठा महासंघ इ. संघटना सांप्रदायिक आहेत. जमातवाद हा कधी राजकीय, कधी प्रादेशिक, कधी आर्थिक तर कधी सामाजिक पैलूंशी हातमिळणी करून भारताच्या अंतर्गत सुरक्षेला आव्हान देत असतो. "

1967 पासून भारताच्या राजकीय, सामाजिक क्षेत्रात नक्षलवाद हा शब्द प्रचलित झाला आहे. नक्षलवाद या नावाला तसा काही तात्त्वीक अर्थ नसला तरी, नक्षलवाद्यांच्या या लढ्याला, अन्याय, जुलूम, शोषणाविरूद्धचा सशस्त्र लढा असे स्वरूप मिळाले आहे. त्यातून जूलमी जमीनदार, निष्क्रीय राज्यकर्ते, भ्रष्ट शासकीय अधिकारी व पोलीस अशा लोकांना मारण्याचे कार्य हे गट करू लागले आहेत.

सुमारे 900 सशस्त्र नक्षलवाद्यांनी 8 फेब्रुवारी 2006 रोजी केंद्रीय औद्योगिक सुरक्षा सैनिकांच्या तळावर (Central Industrial Security Force) हल्ला केला. नक्षलवाद्यांनी आठ जवानांना ठार मारले. यानंतर नक्षलवाद्यांनी National Mineral Development Corporation) हिरोजी येथील दारूगोळा कोठारावर पण हल्ला केला. 50 टन स्फोटके पदार्थांची 18 रायफलीची लुट केली. त्याचबरोबर वॉकीटॉकी, अमोनियम नायट्रेटचे बरेच साहित्य यांची पण लुट केली.

महाराष्ट्र राज्यातही नक्षलवाद्यांचा प्रभाव आजही कायम असल्याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे 01 मे 2019 रोजी गडचिरोली जिल्हयामध्ये कुरखेडा तालुक्यात महाराष्ट्र पोलीसांच्या गाडीला भूसुरुंगाने उडविण्यात आले. त्यात 16 जणांचा मृत्यु झाला आहे असे हे भ्याड हल्ले नक्षलवादी नेहमीच करत असतात.

अशाप्रकारे नक्षलवादी न्याय मागण्यांच्या पाठपुराव्यासाठी आमचा लढा आहे म्हणतात आणि निष्पाप पोलिसांच्या जीवाला धोका पोहचवितात. नक्षलवादी ही एक मोठी डोकेदुखी झालेली आहे. यांच्या हिंसक कारवायामुळे भारतीय जनता मोठे नेते, अभिनेते, उद्योगपती स्वतःला असुरक्षित समजतात.

प्राचीन काळी श्रमविभागणीच्या तत्वानुसार चातुर्वण्य व्यवस्थेच्या अंतर्गत भारतात जातीव्यवस्था निर्माण झाली. परंतु पुढे यामध्ये विकृती निर्माण होऊन ही व्यवस्था केवळ श्रमविभागणी न राहता ती दर्जा, प्रतिष्ठा व उत्पन्न यांच्या विषम वाटणीवर आधारलेली स्तरीकृत समाजव्यवस्था म्हणून दृढ झाली. त्यामध्ये समता व गुणवत्ता यांचा व्यवसायाशी असलेला संबंध तुटून तो जन्म आणि वंशपरंपरेशी जोडला गेला. जातिमुळे समाजातील निरनिराळ्या गटात पृथकपणा आला.

सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायाच्या धोरणामुळे राजकीय हक्क गाजविण्याची स्पर्धा निर्माण झाली. जातीजातीमधील पारंपारिक वैरभावाला राजकीय वैरभावाची जोड मिळाल्यामुळे मोठ्या प्रमाणात जातीवर आधारीत संघर्ष व हिंसा उद्भवली. जातीच्या सहाय्याने लोकांना संघटीत व क्रियाशील बनविणे सोपे असल्यामुळे राजकीय संघटन करण्यासाठी व पाठींब्यासाठी जातीचा राजकारणात मोठ्या प्रमाणात वापर सुरू झाला आहे. राजकीय पक्षांची निर्मिती, पक्षांतर्गत गट, नेतृत्वातील संघर्ष, निवडणूकीतील तिकीट वाटप, प्रचार व आश्वासने जातींना डोळ्यासमोर ठेवून देण्यात येवू लागले. मंत्रीमंडळाची रचना, खाते वाटप इ. बाबतही जात हा निर्णायक घटक बनला.

जातीय दंगलीतून होणारा हिंसाचार भारताच्या अंतर्गत सुरक्षेला मोठे आव्हान आहे. जातीवादाने भारतीय समाजात जातीय आणि वर्गीय संघर्षाला जन्म दिलेला आहे. जातीवादी भावना परजातीबद्दल मत्सर व द्वेष निर्माण करते. जातीवाद भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेला बाधक आहे.

प्रादेशिक असमतोल भारतीय लोकशाहीपुढील मोठी समस्या व आव्हान आहे. सध्या भारत लोकसंख्येच्या दृष्टीने जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे आणि क्षेत्रफळाच्या दृष्टीने सातव्या स्थानावर आहे. भारतासारख्या आकाराने मोठ्या खंडप्राय देशात विकासात असमतोल होणे, स्वाभाविक आहे. भारताच्या स्वातंत्र्यपूर्व काळातही मोठ्या प्रमाणावर असमतोल होता. भारताच्या स्वातंत्र्यानंतर त्यात बदल करण्यासाठी बरेच प्रयत्न केले गेले. तरीही आज मोठ्या प्रमाणात प्रादेशिक असमतोल पहावयास मिळतो.

उदा. महाराष्ट्रात-विदर्भ, 2010 मध्ये आंध्र प्रदेशातील वेगळ्या तेलंगानाच्या मागणीसाठी मोठ्या प्रमाणात जाळपोळ, हिंसाचार झाला ज्यात शेकडो लोकांचे जीव गेले आणि आता तेलंगाना हे नवीन राज्य निर्माण झाले.

मायकेल हेक्टर, "अंतर्गत वसाहतवादाची खरी अथवा काल्पनिक भावना म्हणजे प्रादेशिकता होय." विभागीय अस्मिता व प्रादेशिकता या दोन वेगळ्या बाबी आहेत. इक्बाल नारायण यांनी भारतातील प्रादेशिकतेचे स्वरूप स्पष्ट करतांना त्याचे तीन प्रकार पाडले आहेत. 1) राज्यातंर्गत प्रादेशिकता (Intra-state Regionalism) 2) राज्यपार प्रादेशिकता (Supra - State Regionalism) आणि आंतरराज्य प्रादेशिकता (Inter-State Regionalism)

भारतातील प्रादेशिकतेकडे पाहिल्यास त्याचा अविष्कार खालील वेगवेगळ्या पाच स्वरूपात होत असल्याचे दिसते.

1) भारतीय संघराज्यातून फुटून निघणे.
2) स्वतंत्र घटक राज्याची मागणी करणे.
3) घटक राज्यांना अधिक स्वायत्तता देण्याची मागणी करणे.
4) राज्याराज्यातील संघर्ष.
5) घटक राज्यातील उप-प्रांतीय संघर्ष

भारतात गेल्या काही वर्षात अंतर्गत दहशतवादी हिंसाचाराचे प्रमाण वाढलेले आहे. दहशतवाद आणि धर्म यांच्यातील एक अपवित्र युती विकसित होताना दिसते आहे. या दहशतवादी संघटनांकडून हिंसाचारासाठी वापरल्या जाणाऱ्या पद्धतीमध्ये साम्य आहे. सार्वजनिक जागा, धार्मिक स्थळे, वर्दळीची क्षेत्रे, इ. ठिकाणी हल्ले चढविणे सर्रास चालू आहे. भारतामध्ये मुंबई, लखनौ, वाराणसी, फैझाबाद, हैद्राबाद सारख्या मोठ्या शहरात बॉम्बस्फोट घडवून आणण्यात आलेले आहेत. भारतीय संरक्षण गुप्तहेर संस्थेच्या एका अहवालानुसार पाक व्याप्त काश्मीरमध्ये सत्तरहून अधिक दहशतवादी प्रशिक्षण केंद्रे असून त्यामधून 3 हजाराहून अधिक दहशतवाद्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. या दहशतवाद्यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात जीवीत हानी केली जाते. त्यामध्ये हरकत-ऊलमुजाहिदीन, हरकत-ऊल-जेहाद, अलइस्लामी, लष्कर-इ-तोयबा, जैश-ए-मोहम्मद, आणि लष्कर-ए-तोएबा या पाच इस्लामी संघटना आहेत.

**सारांश :**

भारतातील राजकीय शक्तींनी एकत्र येवून आपले सर्व अंतर्गत मतभेद बाजूला सारून, धर्मनिरपेक्ष विचार करून सांप्रदायिकता, जातीयवाद, प्रतिवाद, नक्षलवाद, दहशतवाद इ. वर सखोल विचारमंथन करून यांची दाहकता कमी करण्याचा प्रयत्न करून सामाजिक समता कशी जोपासली जाईल याचा विचार करणे गरजेचे आहे. तसेच भारतातील नागरीकांनीही जागरुक व डोळस होणे आवश्यक आहे. कोणत्याही शुल्लक कारणासाठी मानवांचे जीव घेणे थांबविले पाहिजे. चार दिवसापूर्वीच भारतातील अल्पसंख्याक जनतेचे मॉबलिचिंग विरुध्द भारतभर निदर्शने केली होती. कोणालातरी मुद्दामहून शंका घेवून बेकायदेशीरपणे प्राणदंड दिले जात आहे. कायदा व सुव्यवस्था खूप मोठया प्रमाणात धोक्यात आलेली आहे. अशा व्यक्तीला पोलीसांच्या हवाली न करता जमाव स्वतः कायदा हातात घेवून त्या संबंधीत व्यक्तीचा भर दिवसा रस्त्यावर जीव घेत आहेत. या प्रश्नावर एकमेव उत्तर म्हणजे भारतीय जनतेमध्ये राष्ट्रीय एकात्मता वाढीस लावली तर भारताला अखंड भारत व शांततामय भारत बनवण्यापासून कोणतीही शक्ती रोखू शकत नाही हे मात्र खरे आहे!

**संदर्भ सूची :**

1) श्यामसुंदर मुळे, भारतीय स्वातंत्र्याची 50 वर्षे, परिमल प्रकाशन औरंगाबाद 18 एप्रिल 1999.
2) प्रा.पी.के. कुलकर्णी, भारतातील धर्म, विद्याभारती प्रकाशन लातूर -1998.
3) डॉ. शैलेंद्र देवळाणकर, समकालीन जागतिक राजकारण, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद मार्च 2010.
4) उदगावकर म.न., एकविसाव्या शतकातील दहशतवाद, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे प्रथमावृत्ती 2007.